# संपादकीय

**प्रा. धनराज तोताराम धनगर,**
**साहाय्यक प्राध्यापक,**
**मराठी विभाग,**
**महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,**
**मालेगाव कॅम्प, जि. नाशिक, महाराष्ट्र, भारत.**

**नमस्कार !**

**Research Journey Multidisciplinary International E-Research Journal** च्या या बहुचर्चित वेबपोर्टलवर आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत ! **'Research Journey'** च्या द्वितीय वर्षातील हा तिसरा अंक आम्ही **'मराठी साहित्य-संशोधन विशेषांक'** म्हणून मराठी भाषा आणि साहित्याला सर्मपित करीत आहोत. मराठीतील साहित्य लेखनाची आणि संशोधनाची परंपरा फार जुनी आहे. काळानुरूप माध्यमांचा खुबीने वापर करण्यातदेखील मराठी साहित्यिक अग्रेसर राहिलेले आहेत. शिलालेख, ताम्रपत्र, भूर्जपत्र, ताडपत्र, पासोडी, विविध धातू पत्रावरील हस्तलेखन लाकडावरील हस्तलेखन, कागदावरील हस्तलेखन ते छपाईच्या अत्याधुनिक साधनांचा वापर मराठीतील सृजनशील लेखनाला बहारदार आणि धारदार स्वरूप प्राप्त करून देणारा ठरलेला आहे. काळानुरूप मराठी साहित्याने स्वीकारलेले हे बदल लेखकाच्या अभिव्यक्तीला अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहचविण्यासदेखील साहाय्यभूतच ठरलेले दिसतात. हे येथे सांगण्याचं प्रयोजन हेच की, सध्याच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगाची पावले ओळखण्याची ही क्षमता आजच्या आमच्या या नव्या पीढीतील साहित्यिक आणि संशोधकांमध्येही दिसते आहे. माहिती तंत्रज्ञनाचा उपयोग संशोधनासाठी व्हावा, जगातील अधिकाधिक ज्ञानी, जाणकारांपर्यंत, आपले संशोधन पोहचावे हा सद्हेतू ठेवूनच आम्ही आपल्या संशोधनाच्या प्रवासातील सहप्रवासी बनून आपल्यासोबत मार्गक्रमण करीत आहोत. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आंतरविद्याशाखीय संशोधकांसोबत, तज्ञासोबत **Research Journey Multidisciplinary International E-Research Journal** च्या माध्यमातून हा सुखद सहप्रवास जानेवरी २०१४ पासून सुरू आहे. लवकरच आपल्या या अंकालाही 'युनिरिसर्च जर्नल' प्रमाणेच **Global Impact Factor** मिळेलच यात तिळमात्रही शंका वाटत नाही.

**रिसर्च जर्नी**च्या या अंकात महाराष्ट्राच्या विविध भागातील संशोधक, विचारवंतांचे लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत. मराठीतील सुप्रसिध्द विचारवंत, साहित्यिक, समीक्षक प्रोफेसर डॉ. म. सु. पगारे आणि त्यांच्या पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांचे दोन लेख या अंकात आहेत. पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शकांकडून तपासलेले काही शोधनिबंध मार्गदर्शकांच्या नावासह प्रकाशित करणे अनेक विद्यापीठांनी बंधनकारक केलेले आहे. त्याचा एक भाग म्हणून या दोन्ही लेखांकडे पाहावे लागेल. प्रत्यक्षात डॉ. म. सु. पगारे यांची लेखणी ही त्याहीपेक्षा कितीतरी दमदार आणि धारदार आहे. महाराष्ट्राला ती सुपरिचित आहे. अर्थातच त्यांच्या नुसत्या नावानेही या आपल्या अंकाला वजन प्राप्त व्हावे. त्यांचे विद्यार्थीदेखील त्यांच्या या पूरोगामी विचारांच्या बैठकीतून आणि त्या सैद्धांतिकतेतून साकारणाऱ्या संशोधनातून तावून सुलाखून बाहेर पडत असतात. सौ भाग्यश्री बुधकर यांचा '१९ व्या शतकातील निवडक स्त्री सुधारकांचा स्त्री विषयक दृष्टिकोन' आणि राजू खंडारे यांचा 'महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार' या दोन्ही लेखांमधून या दोन्हीही उद्योन्मुख समीक्षकांचे व्याक्तिमत्त्व प्रकट होतांना दिसते. सौ भाग्यश्री बुधकर आणि राजू खंडारे यांच्या संशोधनाच्या भावी वाटचालीस मी यानिमित्ताने शुभेच्छा देतो. नवोदित आणि मातब्बर अशा संशोधकांना एकत्र विचारमंच उपलब्ध करून देणे हे रिसर्च जर्नीचे सुरूवातरपासूनचे ध्येयधोरण निश्चितच राहिले आहे. याही अंकात आपणास याचा प्रत्यय येईल.

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

पूरोगामित्व ही मराठी मातीची ओळख आहे. तोच मराठी साहित्याचा आणि विशेषकरून मराठी संशोधनाचाही प्राण आहे. अर्थातच संशोधनासाठी लागणारा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि पूरोगामित्व यांची विभक्ती करता येणार नाही. पूरोगामित्वाचा हा धागा डॉ. प्रमोद खोंड आणि प्रा. अभिजित पाटील या प्राध्यापक द्वयींच्या 'म. फुलेंच्या धर्मविषयक विचारांची दिशा' या लेखांतून तसेच डॉ. सुरेश खोब्रागडे यांच्या 'वसंत आबाजी डहाके यांच्या 'चित्रलिपी'तील महानगरीय जाणीवा' या लेखांमधूनही ठळकपणे जाणवतो. स्त्रीवादी जाणीवांना अधोरेखित करत डॉ. रंजना कदम यांच्या 'शांताबाई शेळके यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्रीविषयक जाणीवांचा अभ्यास' या लेखातूनही पूरोगामित्वाची काही पुटे प्रकट होतांना दिसतात.

डॉ. महादेव कांबळे यांचा 'तमाशाचे बदलते स्वरूप', डॉ. भारती रेवडकर यांचा 'लोकसंस्कृतीतून लोकजीवनाचे संवर्धन', डॉ. शंकर मुंडे यांचा 'रोहा तालुक्यातील 'कातकरी' आदिवासींचे लोकजीवन' आणि प्रा. अंजली पांडे यांचा 'वासुदेव' हे लेख लोकसाहित्याच्या अंगाने जाणारे आणि विशेषतः प्राथमिक स्त्रोतांवर आधारित संशोधनपर लेख म्हणून विशेष उल्लेखनीय म्हणावे लागतील.

संत साहित्य हे मराठीतील अनमोल अशी उपलब्धी आहे. गेल्या आठशे-नऊशे वर्षांपासून मराठी मनाला संस्कारांचे खाद्य पुरविणाऱ्या या साहित्याने येथील साहित्यिक, समीक्षक, विचारवंत, समाजशास्त्रज्ञ, आणि संशोधकांनाही वेगवेगळ्या प्रकारची मूलभूत विचारसामुग्री सिद्धांत तसेच साधनरुपाने दिली आहे. नवोनवोन्मेषतेचा प्रत्यय देणारे संशोधन या साहित्यावर सदैव होत राहिलेले आहे आणि पुढील अनंतकाळात होत राहणार आहे हे सांगायला माझ्यासारख्या यःकश्चित संपादकाची-संशोधकाची निश्चितच गरज नाही. डॉ. वसंत शेंडगे यांनी लिहिलेला शोधनिबंध 'लोकोत्तर विभुती : संत निवृत्तीनाथ', प्रा. संगीता उमाळे यांचा 'संत रामदासांचे दासबोधातील संगीत चिंतन', प्रा. संगीता सूर्यवंशी यांचा 'भारूड : विषयातील विशाल दृष्टिकोन' आदि लेख हे संशोधनातील अशाच नवोनवोन्मेषांचे दर्शन घडविणारे म्हणावे लागतील. संत साहित्यावर होणाऱ्या विपूल संशोधनामुळे एखाद-दुसऱ्या लेखाच्या नावात साम्यसदृश्यता असण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही. मात्र संत साहित्यावरील संशोधनाच्या क्षेत्रात स्वतःची दादागिरी निर्माण करण्याची या संशोधकांची क्षमता स्वयंसिद्धच जाणवते. डॉ. वसंत शेंडगे हे तर संतसाहित्याचे गाढे अभ्यासक म्हणून लवकरच महाराष्ट्रातील गं. बा. सरदार, ल. का. मोहरीर, डॉ. मु. श्री. कानडे, बा. रं. सुंठणकर, डॉ. हे. वि. इनामदार, डॉ. यु. म. पठाण , डॉ. र. रा. गोसावी, डॉ. सदानंद मोरे, डॉ. उ. मा. देशमुख, डॉ. तानाजी पाटील अशांसारख्या दिग्गजांच्या पंक्तीत आपले स्थान निश्चत करतील असा विश्वास वाटतो.

प्रा. छत्रपाल लांबकाने हे एक विदर्भातील नव्या पीढीचे प्रतिनिधित्व करणारे संशोधक आहेत. त्यांचा 'व्यंकटेश मांडगुळकरांच्या वास्तवदर्शी प्रतिभेचा आविष्कार : माणदेशी माणसे' हा शोधनिबंध त्यांच्यातील संशोधकाची छबी प्रकट करणारा आहे. मी या विशेषांकासाठी निवडलेल्या लेखांच्या लेखकांचे, संशोधकांचे विशेष अभिनंदन करतो, आपल्या भावी संशोधनास शुभेच्छा देतो. आमच्या संपादक मंडळाचा, विषयतज्ञांचा आणि तज्ञ मार्गदर्शकांचा ऋणाईत असण्यातच मला धन्यता आहे. अर्थातच या सर्वांशिवाय आणि आपल्या सहकार्याशिवाय आमचा हा प्रवास शक्य नाही याची पक्की जाणीव माझ्या मनाशी सदैव आहेच. वर म्हटल्याप्रमाणेच नवोदित आणि दिग्गजांना एकाच विचारमंचावर आणणारा हा **'मराठी साहित्य-संशोधन विशेषांक '** हा आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटविणारा ठरेल व चोखंदळ वाचकांच्या पसंतीस पात्र ठरेल या खात्रीसह आणि पुन्हा भेटण्याच्या वायद्यावर आपली इथे रजा घेतो !

**धन्यवाद !!!**



**- प्रा. धनराज धनगर (अतिथी संपादक)**